# मंत्रिमंडळ निर्णय

## १३ ऑक्टोबर २०१०

१. अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती विद्यार्थी संख्येत वाढ.

२. जलक्रीडा उपक्रमांवर आकारण्यात येणाऱ्या करमणूक शुल्कात व अधिभारात सुसूत्रता आणण्याचा निर्णय

३. विशेष सहाय्य योजनेच्या मानधनात वाढ

४. कामधेनु दत्तक ग्राम नवीन योजना राबविण्यास मान्यता

५. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील विकास योजनेचा कालावधी कमी करण्याचा निर्णय.

६. स्वातंत्र्य सैनिकांच्या निवृत्तीवेतनात वाढ करण्याचा निर्णय.

७. बुलढाणा जिल्ह्यातील पेनटाकळी प्रकल्पांतर्गत बाधितांचे खास बाब म्हणून पुनर्वसन

८. बुलढाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा प्रकल्पांतर्गत बाधितांचे खास बाब म्हणून पुनर्वसन.

९. राज्यातील जलाशय साठ्यात विक्रमी वाढ.

-----o-----

## अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती विद्यार्थी संख्येत वाढ

अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत असलेली २५ शिष्यवृत्तीची संख्या वाढवून ती ५० इतकी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

वाढीव शिष्यवृत्ती सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येईल. या योजनेकरिता नव्याने अर्ज न मागविता दिनांक ३१ ऑगस्ट २०१० पर्यंत मागविलेल्या व प्राप्त झालेल्या अर्जांमधूनच ५० विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

----0-----

## जलक्रीडा उपक्रमांवर आकारण्यात येणाऱ्या करमणूक शुल्कात व अधिभारात सुसूत्रता आणण्याचा निर्णय

मुंबई करमणूक शुल्क अधिनियमान्वये आकारण्यात येणाऱ्या अधिभाराच्या आकारणीत सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने जलक्रीडा उपक्रमांवर आकारण्यात येणारा अधिभार प्रवेश मुल्याऐवजी देय करमणूक शुल्कावर आकारण्यासाठी या अधिनियमामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महसूलातील तूट भरुन काढण्यासाठी या अधिनियमनामध्ये सुधारणा करून मनोरंजन उद्यानांप्रमाणे जलक्रीडा उपक्रमांवर १५ टक्के दराने करमणूक शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच मुंबई करमणूक शुल्क अधिनियम १९२३ मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी विधी आणि न्याय विभागाशी विचारविनिमय करून अद्यादेश प्रख्यापित करण्यासाठी राज्यपाल महोदयांना विनंती करण्यास अथवा अध्यादेश प्रख्यापित न झाल्यास विधीमंडळाच्या आगामी अधिवेशनात या संदर्भातील विधेयक सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----o-----

१३ ऑक्टोबर २०१०

## विशेष सहाय्य योजनेच्या मानधनात वाढ

समाजातील निराधार दुर्बल घटकांस तसेच निराधार वयोवृध्द व्यक्तींना राज्य शासनाकडून विशेष सहाय्य योजनेअतंर्गत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतंर्गत ५००/- रुपये प्रमाणे नियमित मासिक लाभ देण्यात येतो. यामध्ये १००/- रुपये वाढ करुन आता मासिक ६००/- रुपये देण्यात येतील.

या योजनांमध्ये अंदाजे १५ लाख लाभार्थी लाभ घेत आहेत व अंदाजे १,४०० कोटी रुपये वार्षिक खर्च होत आहे. वरील निर्णयामुळे शासनावर अंदाजे रुपये २०० कोटी इतका वार्षिक भार पडेल.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या सर्व समित्या तात्काळ बरखास्त करण्यात येतील. या समितीच्या अध्यक्षपदी विधानसभा सदस्यांऐवजी पालकमंत्री शिफारस करतील अशा सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात येईल. जिल्हयाचे पालकमंत्री हे अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांची नावे ३ महिन्यातच्या आत संबंधित जिल्हाधिकारी यांना देतील व जिल्हाधिकारी समिती गठणाचे आदेश काढतील. अशा पध्दतीने समिती गठीत होईपर्यंतच्या कालावधीत तसेच जिल्हयाचे पालकमंत्री यांनी अध्यक्ष व अशासकीय यांची नावे ३ महिन्यांच्या आत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिली नाहीत अशा प्रसंगी जिल्हाधिकारी उप विभागीय अधिकारी (महसूल ) यांच्या अध्यक्षतेखाली समितीद्वारे अर्ज मंजुरीबाबत पुढील कार्यवाही करतील.

लाभार्थ्याची मुले २१ वर्षांऐवजी २५ वर्षाची होईपर्यंत किंवा नोकरी मिळेपर्यंत (शासकीय/ निमशासकीय/ खाजगी) यामध्ये जे अगोदर घडेल तोपर्यंत लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल. तसेच ज्या विधवा लाभार्थ्यांना फक्त मुलीच असतील अशा विधवा लाभार्थ्यांच्या बाबतीत मुलींचे वय २५ वर्ष झाले अथवा त्यांना नोकरी लागली किंवा त्यांचे लग्न होऊन नांदावयास गेल्या तरी सुध्दा लाभ चालू राहिल.

शेतमजूर महिला ही व्याख्या संजय गांधी निराधार योजनेच्या पात्रता अटीतून वगळण्यात येत आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमध्ये यापुढे तृतीय पंथी व्यक्ती लाभ मिळण्यास पात्र राहतील.

घटस्फोट प्रकरणातील लाभार्थ्यांच्या बाबतीत संबंधित गावच्या तलाठी व ग्रामसेवक यांनी संयुक्तरित्या दिलेले प्रमाणपत्र आवश्यक राहील. असे प्रमाणपत्र तहसिलदारांनी साक्षांकित करण्याची अट काढून टाकण्यात येत आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत परित्यक्त्या स्त्रियांचाही अंतर्भाव करण्यात येत आहे. त्यांनी याबाबत तलाठी व ग्रामसेवक यांचा संयुक्त दाखला आवश्यक राहील. शहरी भागामध्ये तलाठी किंवा नगरपालिका / महानगरपालिकांचे कर निरीक्षक यांनी दिलेले प्रमाणपत्र आवश्यक राहील.

महिला व बाल विकास विभागामार्फत सध्या ज्या देवदासींना लाभ देण्यात येत आहे. त्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गत लाभार्थी म्हणून समविष्ट करण्यात येत आहे.

-----o------

## कामधेनु दत्तक ग्राम नवीन
## योजना राबविण्यास मान्यता

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत (सर्वसाधारण योजना) **कामधेनु दत्तक ग्राम** ही नवीन योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली.

दत्तक ग्राम म्हणून निवड केलेल्या गावात लसीकरण, वंध्यत्व निवारण, दुग्धस्पर्धा, जंतनाशके पाजणे, विशेष ग्रामसभा आयोजित करणे, इत्यादी एकत्रित कार्यक्रम कालबध्दरित्या मोहिम स्वरुपात राबविण्यात येणार असून गुरांच्या आरोग्याची निगा व व्यवस्थापनात सुधारणा घडवून दुध उत्पादनात वाढ करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. एका दत्तक ग्रामासाठी या योजनेकरिता १,५२,५०० रुपये खर्च येणार आहे. जिल्हा नियोजन समितीमार्फत ही योजना सन २०१०-११ पासून संपूर्ण राज्यात राबवण्यात येईल.

----o-----

## महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील विकास योजनेचा कालावधी कमी करण्याचा निर्णय

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियममध्ये विकास योजना तयार करण्याचा कमी करण्याच्या दृष्टीने या तरतूदीत आवश्यक त्या सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या सुधारणेप्रमाणे यापुढे विकास योजना कमाल साडेचार वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे शक्य होईल.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ अंतर्गत जमिनीचा विकास व वापर यांचे नियोजन करण्याकरिता प्रादेशिक योजना, विकास योजना, नगर रचना योजना तयार करण्याच्या तरतुदी आहेत.

शहराच्या सुनियोजित विकासासाठी विकास योजना तयार केल्या जातात. मात्र विकास योजना तयार करुन त्या मंजूर होण्यास सुमारे १० वर्षाचा कालावधी लागतो दरम्यान शहरांची अनियंत्रित वाढ होते व ज्या उद्देशासाठी विकास योजना केल्या जातात तो उद्देश सफल होत नाही परिणामी त्याच्या अंमलबजावणीत अडचणी येतात.

त्यामुळे शहरांच्या विकास योजना कालबध्दतेत तयार होऊन मंजूर होण्याच्या दृष्टीने, विकास योजना तयार करुन मंजूर करणेचा कमाल कालावधी निश्चित करणे आवश्यक झाले आहे. उक्त अधिनियमात, विकास योजना तयार करुन शासनास सादर करुन त्यास अंतिम मान्यता देण्याची तरतुद प्रकरण - तीन मधील कलम २१ ते ३१ मध्ये दिलेली आहे.

याशिवाय यापूढे मंजूर विकास योजनेचा कालावधी संपण्यापूर्वी किमान तीन वर्ष अगोदर विकास योजना तयार करण्याची प्रक्रिया सुरु करण्याचे निर्देश महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरणांना देण्याचे सुध्दा ठरविण्यात आले.

या निर्णयामुळे यापूढे नागरी क्षेत्राच्या विकास योजना जलद गतीने व कालबध्द पध्दतीने तयार करणे शक्य होणार असून त्यामुळे शहराच्या विकासासाठी गती प्राप्त होण्याची अपेक्षा आहे.

**-----o-----**

१३ ऑक्टोबर २०१०

## स्वातंत्र्य सैनिकांच्या निवृत्तीवेतनात वाढ करण्याचा निर्णय

राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या निवृत्तीवेतनात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांना दरमहा ६००० रुपये तर महिला स्वातंत्र्य सैनिकांना ६१०० रुपये इतके निवृत्तीवेतन देण्यात येत होते. आता सर्व स्वातंत्र्य सैनिकांना दरमहा ८००० रुपये एवढे निवृत्तीवेतन देण्यात येईल.

राज्यातील अनेक स्वातंत्र्य सैनिक संघटनांकडून स्वातंत्र्य सैनिकांना मिळणाऱ्या निवृत्तीवेतनात वाढ करण्यात यावी अशी मागणी सातत्याने शासनाकडे करण्यात येत होती.

या वाढीचा लाभ राज्यातील १०८२८ इतक्या स्वातंत्र्य सैनिक/स्वातंत्र्य सैनिकांच्या विधवा पत्नी यांना मिळेल. या वाढीमुळे राज्य शासनावर रु.२६ कोटी इतका वार्षिक अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे.

----o----

## बुलढाणा जिल्ह्यातील पेनटाकळी प्रकल्पांतर्गत बाधितांचे खास बाब म्हणून पुनर्वसन

बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील पेनटाकळी प्रकल्पांतर्गत घाणमोड या गावाचे खास बाब म्हणून पुनर्वसन करण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच या गावाच्या पुनर्वसनाकरीता येणा-या एकूण रुपये ९९.६३ लाख इतका खर्च विदर्भ विकास पाटबंधारे महामंडळ यांनी करावा असा निर्णय घेण्यात आला.

----o-----

## बुलढाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा प्रकल्पांतर्गत बाधितांचे खास बाब म्हणून पुनर्वसन

बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगांव राजा तालुक्यातील खडकपूर्णा प्रकल्पांतर्गत गारगुंडी गावाचे खासबाब म्हणून पुनर्वसन करण्यास मान्यता देण्यात आली.

मौजे गारगुंडी ता. देऊळगांव राजा, जि. बुलढाणा या गावाचे खासबाब म्हणून पुनर्वसन करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली. या गावाच्या पुनर्वसनाकरीता पुढील प्रमाणे खर्च विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांनी करण्यास मान्यता दिली.

सदर निर्णयानुसार गावातील ४६५ घरांच्या संपादनासाठी २ कोटी रुपये, पुनर्वसन अनुदानासाठी २४ लाख रुपये व गावठाणात पुरवावयाच्या नागरी सुविधांसाठी १ कोटी ४० लाख रुपये म्हणजेच एकूण ३ कोटी ६४ लाख रुपये प्रकल्पग्रस्तांसाठी खर्च करण्यास मंजूरी देण्यात आली.

----o----

## राज्यातील जलाशय साठ्यात विक्रमी वाढ

राज्यात यंदा चांगला पाऊस झाल्याने राज्यातील जलाशय साठ्यात चांगली वाढ झाली आहे. राज्यातील मोठे, मध्यम आणि लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या जलाशयात आतापर्यंत ३२, ०१४ दशलक्ष घनमीटर जलाशय साठा झाला आहे. गतवर्षी हा जलाशय साठा २३,०३२ दशलक्ष घनमीटर तर २००८ मध्ये तो २७,१४६ दशलक्ष घनमीटर एवढा होता.

मागील वर्षी कोकणात ९० टक्के जलाशय साठा होता. चालू वर्षी तो ९९ टक्के आहे. मराठवाड्यात २० टक्के पाणीसाठा होता तो आता ८१ टक्के आहे. नागपूरात गतवर्षी ५२ टक्के पाणीसाठी होता तो यावर्षी ८० टक्के एवढा झाला आहे. अमरावती विभागात गतवर्षी ४१ टक्के पाणी साठा होता त्यात यावर्षी लक्षणीय वाढ होऊन तो ८४ टक्के एवढा झाला आहे. नाशिक विभागात गतवर्षी ६० टक्के पाणी साठा होता तो यावर्षी ७५ टक्के झाला आहे. तर पुणे विभागात गतवर्षी ८५ टक्के पाणी साठा होता तो यावर्षी ९२ टक्के एवढा झाला आहे.

------o-------